# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 October 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- सिडको महामंडळाचे भूखंड कब्जेहक्काने रुपांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
- जालना–नांदेड द्रुतगती महामार्ग तसंच लातूर जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पांनाही मंजुरी
- छत्रपती संभाजीनगर इथं जेएसडब्ल्यू कंपनीला वाहन निर्मिती उद्योगासाठी भूखंडाचं देकारपत्र
- ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आणि

- ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर नागपुरात दीक्षाभूमीवर धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ

****

सिडको महामंडळाचे भूखंड कब्जेहक्काने रुपांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे अनेक गृहनिर्माण संस्था या जागेच्या मालक होणार असून, त्यांना नाहरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता राहणार नाही. नागरिकांच्या सोयीसाठी शासनाने हे भूखंड एकरकमी विहीत शुल्क आकारून भाडेपट्ट्यांऐवजी कब्जे हक्काने वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील वणी इथं वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करून त्यासाठी पद मंजूर करण्यास कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

निम्न तेरणा उपसा सिंचन प्रकल्पाच्या दुरूस्तीला काल मंत्रिमंडळानं मान्यता दिली. यासाठी ११३ कोटी रुपये खर्च प्रस्तावित आहे. धाराशिव, तुळजापूर, लोहारा आणि औसा तालुक्यातील शेतकऱ्यांसह धाराशिव शहरालाही या निर्णयाचा लाभ होणार आहे.

शिंपी, गवळी, लाडशाखीय वाणी-वाणी, लोहार, नाथपंथीय समाजासाठी महामंडळ स्थापन करणं तसंच राज्यात सार्वजनिक प्रकल्पबाधित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन तसंच विकास करण्यासाठी नागनाथ आण्णा नायकवडी प्रकल्पग्रस्त पुनर्वसन तसंच विकास महामंडळ स्थापन करण्यास काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्यासंदर्भात नॉन-क्रीमीलेअरच्या उत्पन्नाची मर्यादा आठ लाखांवरून पंधरा लाख रुपये करण्याची शिफारस केंद्र शासनास करण्याचा निर्णयही काल राज्य मंत्रिमंडळाने घेतला.

मंत्रिमंडळाने काल घेतलेल्या इतर निर्णयांचा हा संक्षिप्त आढावा...

***''केंद्राची ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबवण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. या योजनेंतर्गत माहिती निर्मिती कक्ष, शेतकरी माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच आणि भूसंदर्भांकित भूभाग असणारे 'गाव नकाशे माहिती संच' महसूल विभाग तयार करेल. पिकांच्या माहिती संचासाठी वार्षिक सुमारे ८१ कोटी ८३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.***

***राज्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोलीसह एकूण २१ जिल्ह्यांमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला.***

***महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अध्यादेशाच्या प्रारूपास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. हा अध्यादेश विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल.***

***आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पासाठी केंद्रचालकांना ग्रामरोजगार सेवकांच्या धर्तीवर दरमहा दहा हजार रुपये मानधन ग्रामपंचायीतमार्फत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.***

***हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन आणि प्रशिक्षण केंद्रासाठी ७०९ कोटी २७ लाख रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.***

*नागपूर मुंबई समृध्दी महामार्गाला जोडणाऱ्या जालना ते नांदेड द्रुतगती महामार्गाला या बैठकीत मंजुरी देण्यात आली.*

*लातूर जिल्ह्यासह राज्यात सावनेर, कणकवली, राजापूर, अंबरनाथ, जिहे कठापूर इथल्या विविध जलसंपदा प्रकल्पांच्या कामांना मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली.*

*राज्यातील पत्रकार तसंच वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळं स्थापन करणं, राज्यातील रुग्णालयांमध्ये सुलभ शौचालय, स्नानगृह संकुल तसंच निवास सुविधा उपलब्ध करून देणं, अंगणवाड्यांमध्ये ३४५ पाळणाघरं सुरु करणं, तीन नव्या खासगी विद्यापीठांना मान्यता, नवीन महाविद्यालयं–नवीन अभ्यासक्रम तसंच अतिरिक्त तुकड्यांसाठी अर्ज करण्याला येत्या ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ, महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमात सुधारणा, मराठवाड्यातील शाळांकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत निधी वाटप, शाळांना २० टक्के वाढीव अनुदानाचा टप्पा, मौलाना आझाद महामंडळाच्या भागभांडवलात वाढ, मदरशांमधील शिक्षकांच्या मानधनात वाढ, धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या अधिनियमात सुधारणा, आदी निर्णयांना आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.''*

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीत ६३६ एकर जागेचं जेएसडब्लु ग्रीन मोबीलिटी कंपनीला देकार पत्र देण्यात आलं आहे. या जागेवर २७ हजार २०० कोटी रुपये गुंतवणुकीतून सुमारे साडे पाचशे एकर क्षेत्रावर इलेक्ट्रिक कार तर ९० एकर क्षेत्रावर व्यावसायिक वाहनांची निर्मिती केली जाणार आहे. यातून प्रत्यक्ष पाच हजार तर अप्रत्यक्ष १५ हजार रोजगार निर्मिती होणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्या पार्थिव देहावर काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. देशाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक जडणघडणीत अमूल्य योगदान देणाऱ्या या थोर व्यक्तिमत्त्वाला मुंबईत वरळी इथल्या विद्युत दाहिनीत अखेरचा निरोप देण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यावेळी केंद्र सरकारच्या वतीनं टाटा यांच्या पार्थिव देहाला पुष्पहार अर्पण करून

श्रद्धांजली वाहिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, टाटा मोटर्सचे अध्यक्ष नटराजन चंद्रशेखरन् यांच्यासह उद्योग, चित्रपट, आणि राजकारणासह समाजाच्या सर्वच क्षेत्रातले मान्यवर यावेळी उपस्थित होते. मुंबई पोलिस दलाच्या वतीनं यावेळी शोकधून वाजवून तसंच हवेत बंदुकीच्या फैरी झाडत रतन टाटा यांना मानवंदना देण्यात आली.

रतन टाटा यांचं परवा रात्री मुंबईत ब्रीच कॅण्डी रुग्णालयात निधन झालं, ते ८६ वर्षांचे होते.

****

रतन टाटा यांच्या निधनाबद्दल राज्यात काल दुखवटा पाळण्यात आला, त्यामुळे नांदेड इथला महिला सक्षमीकरणाचा कालचा नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातले मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीतले कालचे नियोजित कार्यक्रमही स्थगित झाले आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यात खर्डा-चौसाळा-लोखंडी सावरगांव या रस्त्याच्या कामाचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज सकाळी दूरदृष्य प्रणालीद्वारे होणार आहे.

****

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आज नांदेड दौऱ्यावर येत आहेत. आज सायंकाळी साडे चार वाजता ते शासकीय विश्रामगृहात विविध क्षेत्रातील मान्यवरांची भेट घेऊन सायंकाळी मुंबईला प्रयाण करतील.

****

६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्तं नागपुरात दीक्षाभूमी इथं कालपासून धम्मदीक्षा सोहळ्याला प्रारंभ झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, आर्य भदंत सुरई ससाई यांच्या उपस्थितीत अनेक उपासक आणि श्रामणेर यांना धम्मदीक्षा देण्यात आली. हा धम्मदीक्षा सोहळा उद्यापर्यंत चालणार आहे. दीक्षा घेण्यासाठी अनेक अनुयायी दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दक्षिण मध्य रेल्वेने नागपूर मार्गे नांदेड- अमला- नांदेड  विशेष गाडी ची एक फेरी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष गाडी नांदेड इथून आज रात्री ११ वाजता सुटणार आहे.

****

शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त आज धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी देवीची महिषासूर मर्दिनी अलंकार महापूजा मांडण्यात येणार आहे. काल देवीची भवानी तलवार अलंकार महापूजा मांडण्यात आली. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांना धर्म रक्षणासाठी तुळजाभवानी मातेने भवानी तलवार दिल्याची, आख्यायिका यामागे सांगितली जाते.

****

आंतरराष्ट्रीय बालिका दिवस आज पाळण्यात येत आहे. मुलींची भविष्याबाबत संकल्पदृष्टी ही यंदाच्या बालिका दिनाची संकल्पना आहे. मुलींना लैंगिक समानता आणि शिक्षणाच्या समान संधी याचं महत्त्व पटवून देणं हा या दिवसाचा उद्देश आहे. दरम्यान लैंगिक शोषणाविरुद्ध शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी सतर्क राहून एकत्रित प्रयत्न करण्याची आवश्यकता अहिल्यानगरच्या प्रधान जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी व्यक्त केली आहे. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीनं शालेय विद्यार्थिनी सुरक्षेबाबत काल घेण्यात आलेल्या एका कार्यशाळेत त्या बोलत होत्या. संवाद हा फक्त बोलण्यातून नव्हे तर वागण्यातून आणि हावभावातून जाणवत असल्याकडे न्यायाधीश शेंडे यांनी लक्ष वेधलं.

****

बीडचे आमदार संदीप क्षीरसागर काल बीड तहसील कार्यालयात आढावा बैठक घेतली. प्रलंबित कामं तातडीने मार्गी लावणं तसंच नागरिकांच्या विविध प्रश्नांवर योग्य कार्यवाही करण्याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या प्रसिद्ध तारा पान सेंटरचे संचालक शरफोद्दीन सिद्दिकी उर्फ शरफूभाई यांचं काल निधन झालं, ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

परभणी इथं विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर स्वीप कक्षाची काल बैठक घेण्यात आली. या बैठकीत विविध मतदार गटांमध्ये जागरूकता वाढवून मतदान टक्केवारीत वाढ कशी करता येईल, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

****

स्पेनचा टेनिसपटू राफेल नदालने व्यावसायिक टेनिस मधून निवृत्ती जाहीर केली आहे. येत्या नोव्हेंबरमध्ये होणारी डेविस चषक स्पर्धा आपली अखेरची स्पर्धा

असेल, असं नदालने साामजिक संपर्क माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. आपल्या सुमारे २४ वर्षांच्या कारकिर्दीत नदालने २२ ग्रँड स्लॅम्स पटकावले आहेत, मानाची सर्व चार एकेरी ग्रँड स्लॅम विजेतेपदं आणि ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणारा तो एकमेव टेनिसपटू आहे.

****

हवामान

राज्यातल्या बहुतांश जिल्ह्यात आज तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. छत्रपती संभाजीनगर परिसरात आज पहाटेच्या सुमारास पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या.

****

..........................................................................